# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (प्र-कुलगुरु कार्यालय)

**डॉ. श्रीराम. एस.कावळे**
एम.ए.(अर्थशास्त्र), पीएच.डी..एम.कॉम. डी.बी.एम.
जी.डी.सी. अँन्ड ए. ( प्र-कलगरू)

**एम.आय.डी.सी.रोडकॉम्पलेक्स गडचिरोली-४४२६०५(म.रा)**
**दुरध्वनी क्र.०७१३२-२२२२५७**
**ई.मेल-** provc.gug@gmail.com

जा.क्र. गोविग/प्र.कुल.का/२६३७/२०२५ दि. २८/०७/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी
संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय :—** दिनांक ०९सप्टेंबर, २०२५ रोजी झाडीबोली नाट्यसंमेलनील स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाची एकांकिका पाठवून सहभाग नोंदविण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे मा. कुलगुरू महोदय डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाने झाडीबोली नाट्यसंमेलनाचे (वर्ष २ रे) आयोजन करण्यात येत आहे. आयोजित झाडीबोली नाटयसंमेलनाकरीता आपल्या महाविद्यालयातील एक एकांकिका व एकपात्री अभिनय दिनांक ०५/०९/२०२५ रोजीपर्यंत पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे पाठविण्यात यावे. तसेच सदर संमेलनामध्ये सहभागी होण्याकरीता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे व महाविद्यालयाव्दारे त्यांचा सहभाग नोंदविण्याची कार्यवाही घेवून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करावा.

**सहपत्र:—** नाटयसंमेलनाचे प्रारूप

डॉ. श्रीराम कावळे
प्र—कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**डॉ. श्रीराम श्रा. कावळे**
प्र--कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग व झाडीबोली साहित्यदालन अंतर्गत झाडीबोली नाट्यसंमेलन (वर्ष २ रे) आयोजन करण्यात येत आहे. झाडीपट्टीतील सामाजिक समस्या, झाडीपट्टीतील परंपरागत लोककला, भाषा बोली, आचार—विचार व संस्कृती यांची ओळख व अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि झाडीपट्टी रंगभूमीचे जतन व संवर्धन करणे या उद्देशाने मा. कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे गोडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाने गोंडवाना विद्यापीठातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे झाडीबोली नाट्यसंमेलन होत आहे. तरी या नाट्यसंमेलनात होणाऱ्या विविध उपक्रमात गोंडवाना विद्यापीठातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील (चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा) विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त संख्येने विविध उपक्रमांत सहभागी व्हावे असे सूचित करण्यात येत आहे.

### झाडीबोली नाट्यसंमेलन

**झाडीबोली नाट्यसंमेलन अध्यक्ष** — डॉ. हरिश्चंद्र बोरकर
**स्वागताध्यक्ष** — डॉ. प्रशान्त बोकारे, मा. कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
**उद्घाटक** — डॉ. अविनाश आवलगांवकर, मा. कुलगुरू, रिध्दपूर मराठी विद्यापीठ, अमरावती
**प्रमुख उपस्थिती** — डॉ. श्रीराम कावळे, मा. प्र—कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
डॉ. अनिल हिरेखण, मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
डॉ. श्याम खंडारे, मा. अधिष्ठाता, मानवविद्याशाखा व समन्वयक, पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
**प्रमुख अतिथी** — पद्मश्री डॉ. परशूरामजी खुणे, नाट्यकलावंत
डॉ. श्याम मोहरकर, माझी झाडीबोली नाट्य अध्यक्ष
डॉ. सदानंद बोरकर (नाटककार व नाट्यकलावंत)
डॉ. केशव देशमुख

**नाट्यसंमेलन समन्वयक** — डॉ. निळकंठ नरवाडे, सहायक प्राध्यापक, प.शै. मराठी विभाग, गो.वि.ग

## झाडीबोली नाट्यसंमेलनातील विविध उपक्रम

**झाडीबोली एकांकिका स्पर्धा**
झाडीबोली एकपात्री/नाट्यछटा स्पर्धा
झाडीबोली लोककला स्पर्धा
स्पर्धेचे पारितोषके — रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पारितोषकाचे स्वरूप राहील.

१) **झाडीबोली एकांकिका स्पर्धा** — प्रथम पारितोषक
रोख रक्कम — ६०००/—, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
२) **झाडीबोली एकांकिका स्पर्धा** — द्वितीय पारितोषक
रोख रक्कम — ३०००/—, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
३) **झाडीबोली एकांकिका स्पर्धा** — उत्तेजनार्थ पारितोषक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

एकपात्री अभिनय/ नाट्यछटा स्पर्धा
१) **प्रथम एकपात्री अभिनय पारितोषक**
रोख रक्कम २०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
२) **द्वितीय एकपात्री अभिनय पारितोषक**
रोख रक्कम १०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
३) **उत्तेजनार्थ एकपात्री अभिनय पारितोषक** स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

झाडीबोली लोककला स्पर्धा
१) **झाडीबोली लोककला — प्रथम पारितोषक**
रोख रक्कम २०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
२) **झाडीबोली लोककला — द्वितीय पारितोषक**
रोख रक्कम १०००/— स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
३) **झाडीबोली लोककला — उत्तेजनार्थ** पारितोषक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

स्पर्धेचे नियम व अटी

१) सदर स्पर्धा झाडीबोली मराठी भाषेतच होईल ही स्पर्धा गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील महाविद्यालयांना लागू राहील.

२) सादरीकरणात कोणत्याही जातीचा, धर्माचा राजकीय व्यक्तीचा उल्लेख नको. सामाजिक तेढ उत्पन्न होईल असे सादरीकरण नको. तसे आढळून आल्यास प्रवेश थांबवण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार नाट्य समितीस असेल.

३) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश अर्ज करण्यासाठी पुढील मोबाईल नंबर ९५०३०८१७९० वर संपर्क करावा. प्रवेश अर्ज भरून पाठविण्याची अंतिम तारीख ०५ सप्टेंबर, २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.

४) स्पर्धेसाठी प्राचार्यांनी प्रमाणित केलेला साधा अर्ज भरून पाठवावा त्यासोबत दोन संहिता प्रती महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचे ओळखपत्र असावेत.

५) एकांकीकेचा कालावधी कमीत कमी ३० मिनिटे व जास्तीत जास्त ४० मिनिटे असेल व एकपात्री अभिनयासाठी चा कालावधी कमीत कमी ५ मिनिटे असेल. वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळणे ही प्रत्येक संघाची कर्तव्य असणार आहे.

६) सर्व कलावंतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील.

७) झाडीपट्टीतील लोककला स्पर्धा — दंडार, खडीगंमत, डाहका, झडत्या, महादेवाची गाणी, पांगुळ, एक्का, कुरमारांची गाणी, कुरमारी घोंगडी आदिवासीचे वाद्य, आदिवासी नृत्य आदी प्रकारामध्ये सहभाग घेता येईल.